# नमुना २

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर
(मराठी,इंग्रजी,हिंदी,उर्दू,तामिळ इत्यादी माध्यम )

पुणे जिल्हा परिषद ,पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
जा.क्र.जि.प.शिक्षअण /प्राथ.खाप्राशा / ५७ /२०२०
पुणे -१ दिनांक - २४/ १ /२०२०

प्रति ,

अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक ,

माऊंट झायन एज्युकेशन फाउंडेशन सर्वे नं ४०/२ कृष्णनगर महमंदवाडी हडपसर पुण संचलित अबंडन्ट लाईफ स्कूल हडपसर पुणे

विषय - बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम ,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२००१ याचा नियम ११,पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेल्या पत्रव्यवहार /शाळेची केलेली तपासणी याआधारे मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) पुणे जिल्हा परिषद,पुणे दिनांक १ एप्रिल २०१९ पासून ते ३१ मार्च २०२२ पर्यंतच्या कालावधीसाउसाठी इ १ ली ते ८ वी साठी माऊंट झायन एज्युकेशन फाउंडेशन सर्वे नं ४०/२ कृष्णनगर महमंदवाडी हडपसर पुण संचलित अबंडन्ट लाईफ स्कूल हडपसर पुणे तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

३. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ (जोडपत्र एक ) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११४ (जोडपत्र दोन) शाळा पालन करील.

३.शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणी वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल परंतु आणखी असे की,पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

४.परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅंक खाते देण्यात येईल.

५.संस्था /शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोण्त्याही छाननी पध्दतीसाठी किंवा त्यांच्या किंवा त्यांच्या मात्यापित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६.कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी ,धर्म,जात, किंवा वंश ,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

७.(एक ) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही.

( दोन ) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

( तीन ) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षाउत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही .

( चार ) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

( पाच ) विकलांग / विषेश गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

( सहा ) अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल.परंतू आणखी असे की,अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

( सात ) अधिनियमाच्या कलम २१(१) मध्ये निर्विर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील.

(आठ ) शिक्षकाने / शिक्षिकेनें खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये,याची सुनिश्चिती शाळा करेल.

८.शाळा समुचित प्राधिकारणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९.शाळा ,अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणेच शाळेतउलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०.शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करीत. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत

उलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या. -

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - ४०००० स्के फूट
- एकूण बांधकाम क्षेत्र - २६५५० स्के फूट
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ -१८८०० स्के फूट
- वर्ग खोल्यांची संख्या - १९
- कार्यालय -नि- भांडार - नि - मुख्याध्यापकाची खोली - १

- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? -

| बाब | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास | ३ | ३ |
| मुता-या | ८ | ७ |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा - **आहे.**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर - **लागू नाही.**
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांचीउपलब्धता - **आहे.**
- वाचन साहित्य विनासायासउपलब्ध - आहे **(ग्रंथालय पुस्तक संख्या - २५०० नियतकालिक / वर्तमानपत्र ३ )**

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या ,शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२ . शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६०(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेपार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या ,गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठवण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक प्राथ./स्वअशा/इं. एस.एस.सी /केईडी /हवेली / असा आहे तसेच आपल्या शाळेचा U-DISE No. २७२५१७००३३० हा आहे.या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा याची नोंद घ्यावी.

१७. मा.शिक्षणसंचालक /जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

22/9/2000

**शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )**
**पुणे जिल्हा परिषद ,पुणे.**